# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 11 January 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ जानेवारी २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- विकसित भारतासाठी शंभर टक्के नागरिकांना पायाभूत सुविधा मिळण्याची आवश्यकता पंतप्रधानांकडून व्यक्त
- "अंमली पदार्थांची तस्करी आणि राष्ट्रीय सुरक्षा" या विषयावर आज नवी दिल्लीत राष्ट्रीय परिषदेचं आयोजन
- महाकुंभ मेळ्याला समर्पित आकाशवाणीच्या विशेष कुंभवाणी वाहिनीचं लोकार्पण
- नांदेड इथले शेतकरी रत्नाकर ढगे यांना प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी राष्ट्रपतींकडून निमंत्रण

आणि

- स्वयंसहाय्यता गट उत्पादनांच्या ऑनलाईन विक्रीसाठी जालन्याची पथदर्शी जिल्हा म्हणून निवड

****

विकसित भारत घडवण्यासाठी शंभर टक्के नागरिकांना पायाभूत सुविधा मिळण्याची आवश्यकता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे. उद्योजक निखिल कामथ यांच्या पॉडकास्टसाठी घेतलेल्या मुलाखतीत ते काल बोलत होते. राजकारणात यशस्वी होण्यासाठी समर्पण, वचनबद्धता, नेतृत्व आणि जनतेसाठी कायम उपलब्ध असणं आवश्यक असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. चांगल्या लोकांनी फक्त महत्त्वाकांक्षा न बाळगता एका ध्येयाने राजकारणात प्रवेश करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं. पंतप्रधान पदाच्या आपल्या कारकिर्दीचा आढावा घेत, विकसित भारताबाबत ते म्हणाले…

***''पहली टर्म मे तो लोग मुझे भी समझने की कोशिश करते थे। और मै भी दिल्ली को समझने की कोशिश कर रहा था। पहले और दुसरे टर्म मे मै बीते हुये कल के संदर्भ मे सोचता। तिसरे टर्म मे मेरी सोच का दायरा बदल चुका है। मेरा हौसला ज्यादा बुलंद हो चुका है। मेरे सपनों का विस्तार हो चुका है। मेरे अरमान बढते चले जा रहे है। कहने का तात्पर्य है की, मुझे 2047 विकसित भारत मतलब की भाषण नही है जी। टॉयलेट 100% हो जान चाहीये। बिजली 100% होने जा रही है। नल से जल 100% हो जाना चाहीये। सामन्य मानवी को 100% डेलिवरी होनी चाहीये।''***

****

"अंमली पदार्थांची तस्करी आणि राष्ट्रीय सुरक्षा" या विषयावर आज नवी दिल्लीत राष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या परिषदेत आठ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे राज्यपाल, उपराज्यपाल, मुख्यमंत्री तसंच विविध संस्थांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, शाह यांच्या हस्ते यावेळी अंमली पदार्थ निर्मूलन पंधरवड्याचा शुभारंभ तसंच मानस-२ या ऑनलाईन मदत कक्षाचे उद्घाटनही होणार आहे.

****

केंद्र शासनाकडून सर्व राज्यांचा कर संकलनातला वाटा म्हणून, एक कोटी ७३ लाख ३० हजार कोटी रुपये निधीचं काल हस्तांतरण करण्यात आलं. यात महाराष्ट्र राज्याचा १० हजार ९३० कोटी ३१ लाख रुपयांचा वाटा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे याबद्दल आभार मानले आहेत.

दरम्यान, राज्याचा महसूल वाढवण्यासाठी तसंच महसुलातली चोरी रोखण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांनी काल चंद्रपुरात वार्ताहरांशी बोलतांना ही माहिती दिली...

***''जी काही महसुलात चोरी होतेय आणि राज्याच्या तिजोरीत जो काही महसूल यायला पाहिजे, तो काही लोकं आपल्या तिजोरीत घेऊन चालेले आहेत किंवा तो बुडवतायत वेगवेगळ्या प्रकारच्या क्लृप्त्या करून. त्यामुळे त्यात योग्य रायशनलायजेशन करून राज्याचा महसूल***

***राज्याला कसा मिळेल यासंदर्भात ही समिती तयार करण्यात आलेली आहे.''***

****

एचएमव्हीपी विषाणूबाबत नागरिकांनी घाबरून जाऊ नये, मात्र खबरदारी घेण्याचं आवाहन केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं आहे. ते काल यवतमाळ इथं वार्ताहरांशी बोलत होते. हा आजार नवीन नसून, या आजाराचे आतापर्यंत आढळलेले रुग्ण बरे होऊन घरी गेल्याचं जाधव यांनी सांगितलं. ते म्हणाले...

***''हा व्हायरस जो आहे, तो साधारण थंडीच्या दिवसामध्ये ज्या लोकांमध्ये इम्युनिटी कमी आहे, लहान मुलं असतील किंवा वयस्कर माणसं असतील यांच्यामध्ये तो आढळतो. सर्वांना विनंती आहे की, आपण काळजी घ्यावी. सर्दी, खोकला किंवा शिंक असेल तर त्या ठिकाणी मास्क किंवा रूमाल त्यांनी वापरला पाहिजे. हात वारंवार धुतले पाहिजेत. सॅनिटायजरचा वापर केला पाहिजे.''***

****

महाकुंभ २०२५ ला समर्पित आकाशवाणीच्या विशेष कुंभवाणी वाहिनीचं काल उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते लोकार्पण झालं. प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सेहगल, मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यावेळी उपस्थित होते. केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून या कार्यक्रमात सहभागी झाले होते...

***''२६ फेब्रुवारीपर्यंत महाकुंभमेळ्यात होणाऱ्या अमृतस्नानासह सर्व कार्यक्रमांचं कुंभवाणी वाहिनीवरून थेट प्रसारण केलं जाईल, पहाटे पाच वाजून ५५ मिनिटांपासून रात्री दहा वाजून पाच मिनिटांपर्यंत ही वाहिनी दररोज कार्यरत असेल. आकाशवाणीच्या १०३ मेगाहर्टझ लहरींवर, 'न्यूज ऑन ए आय आर' या ॲप वर, तसंच 'वेव्ज' या ओ टी टी मंचावरही कुंभवाणी चं प्रसारण ऐकता येणार आहे.''***

****

२१ व्या थर्ड आय आशियाई चित्रपट महोत्सवाला कालपासून मुंबईत प्रारंभ झाला. चित्रपट क्षेत्रातल्या अव्दितीय योगदानाबद्दल प्रसिद्ध पटकथा लेखक आणि गीतकार पद्मभूषण जावेद अख्तर यांना महोत्सवाचे अध्यक्ष किरण शांताराम यांच्या हस्ते

'एशियन कल्चर' या विशेष पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. १६ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात अनेक दर्जेदार कलाकृती पहायला मिळणार आहेत.

****

सुसंस्कृत पिढी घडवण्यासाठी विद्यार्थ्यांवर चांगल्या संस्कारांची आवश्यकता असल्याचं सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी म्हटलं आहे. लातूर इथं तीन दिवसीय मराठवाडा शैक्षणिक महासंमेलनाचं उद्घाटन पाटील यांच्या हस्ते काल झालं, त्यावेळी ते बोलत होते. मुख्याध्यापकांच्या दोन दिवसीय ६१ व्या राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलनाचेही काल पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झालं. संस्कारक्षम पिढी घडवण्यासाठी ज्ञान मंदिरांची अधिक गरज असल्याचं मत पाटील यांनी व्यक्त केलं.

****

बीड इथले मस्सोजागचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी खासदार बजरंग सोनवणे यांनी आयोगाकडे मागणी केली होती.

दरम्यान, या हत्या प्रकरणाचा खटला जलदगती न्यायालयात चालवावा, तसंच या प्रकरणातल्या दोषींना फाशीची शिक्षा द्यावी यासह अन्य मागण्यांसाठी काल जालना इथं आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

****

नांदेड जिल्ह्यातल्या लोहा तालुक्यातले सायाळ इथले शेतकरी रत्नाकर ढगे यांना प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रपतींकडून निमंत्रण मिळालं आहे. गेल्या १५ वर्षांपासून सेंद्रीय शेतीबाबत जनजागृती करत असलेले ढगे यांनी राष्ट्रपतींचे आभार मानले आहेत.

> ***''महामहिम राष्ट्रपती महोदयांकडून आम्हाला सव्वीस जानेवारीच्या दिवशी आमंत्रण आलेलं आहे. त्याबद्दल राष्ट्रपती महोदयांचे खूप खूप आभार. आमची जी मातीमधील चळवळ दिल्लीमध्ये त्याची दखल घेतली गेली. आज आमच्यासाठी खूपच आनंदाचा क्षण आहे. माझी सेंद्रीय शेतीच्या अनुषंगाने पुढील पिढी निरोगी आणि तंदुरूस्त राहिली पाहिजे या उद्देशानं मी सेंद्रीय शेतीमध्ये फार मोठं काम करतो.''***

****

स्वयंसहाय्यता गटांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांच्या ऑनलाईन विक्रीसाठी जालना जिल्ह्याची पथदर्शी जिल्हा म्हणून निवड करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, वर्षा मीणा यांनी ही माहिती दिली. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जालना इथल्या उमेद मार्टचं काल मीणा यांच्या हस्ते उदघाटन झालं, त्यावेळी त्या बोलत होत्या.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या वतीनं तीन दिवसीय सिद्धा महोत्सवाला आजपासून प्रारंभ होत आहे. उमेद स्वयंसहायता समूहातील महिला बचतगटांनी उत्पादित केलेल्या वस्तू इथं उपलब्ध असतील. नागरिकांनी या महोत्सवाला भेट देण्याचं आवाहन, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाचे प्रकल्प संचालक अशोक सिरसे यांनी केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं काल जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते रस्ता सुरक्षा अभियानाची सुरूवात करण्यात आली. सुरक्षा केवळ रस्त्यावरच नव्हे तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आवश्यकअसल्याचं स्वामी यांनी  यावेळी सांगितले.

प्रत्येक व्यक्तीनं अपघात कमी करण्याचा संकल्प करण्याचं आवाहन स्वामी यांनी यावेळी केलं.

दरम्यान, बीड इथं विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सोनी यांनी रस्ता सुरक्षा सप्ताह कार्यक्रमात मोटर वाहन कायदा आणि नियम या विषयांवर मार्गदर्शन केलं.

****

शाकंभरी नवरात्र महोत्सवात काल तुळजाभवानी देवीची शेषशायी अलंकार महापूजा मांडण्यात आली. सायंकाळी प्रक्षाळ पूजेनंतर देवीचा सिंह या वाहनवरून छबिना काढण्यात आला.

****

भारत आणि आयर्लंड महिला क्रिकेट संघातल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतला पहिला सामना भारतानं सहा विकेटने जिंकला. मालिकेतला दुसरा सामना उद्या होणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या क्रीडा-सांस्कृतिक महोत्सवाचा काल समारोप झाला, राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्याहस्ते विजेत्यांना

पारितोषिकं प्रदान करण्यात आली. दरम्यान, परभणी जिल्हा महसूल विभागाच्या क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धांना कालपासून प्रारंभ झाला.

****

धाराशिव इथल्या श्रीपतराव भोसले हायस्कूलची विद्यार्थिनी अश्विनी शिंदे हिची पहिल्या जागतिक विश्वचषक खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. येत्या १३ ते १५ जानेवारी दरम्यान नवी दिल्ली इथं या स्पर्धा होणार आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या स्वामिनी समस्त महिला मंडळ समितीच्या 'स्वामिनी- जाणीव स्त्रियांच्या अस्तित्वाची' या महिला वार्षिक अंकाचं आज प्रकाशन प्रसिध्द होणार आहे. सिडको परिसरातील गुलाब विश्व हॉलमध्ये होणाऱ्या या प्रकाशन सोहळ्याला अधिकाधिक नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन, मंडळाच्या अध्यक्ष डॉ सुनिता शिंदे यांनी केलं आहे.

****

परभणी जिल्ह्यात काल आरंभिक बालसंगोपन आणि बालशिक्षण दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संख्यागाणी, अंक गोल, संख्यांची गोष्ट,यासारखे खेळ घेतले गेले.

****

छत्रपती संभाजीनगर इथं मुकुंदवाडी रेल्वेस्टेशन परिसरात विदेशी बनावटीच्या पिस्तुलची विक्री करणाऱ्या एका इसमाला पोलीसांनी काल सापळा रचून अटक केली. गजानन ढवळे असं या इसमाचं नाव असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****